जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१२/०४/२०२४
## दि.११/०४/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २२४/२०२४,भादविक ३०४(अ),२७९ मो.वा.का.कलम १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | युवराज मारणे, वय ३९ वर्षे रा.धायरीफाटा,पुणे |
| **आरोपीत** | पाण्याचा टँकर चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०४/२०२४ रोजी दुपारी १२/४५ वा.चे सुमा. न-हे धायरी रोडवर नवले हॉस्पिटलचे बाहेर डी मार्ट आऊटलेटचे समोर न-हे पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील पाण्याचा टँकर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार फिर्यादी यांचा पुतण्या नयन आदेश मारणे, वय २० वर्षे, रा. धायरीफाटा,पुणे हा मोटार सायकलवरून चालला असताना यांस टँकरची धडक लागुन तो गाडीसह पडल्याने त्याचे अंगावरून सदर पाण्याचा टँकर गेल्याने तो गंभीर जखमी झाल्याने त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. राहुल यादव मो.नं.९५५२१६०७२० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे १४०/२०२४,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ६०वर्षे रा.गल्ली नंबर ८० बी,मित्रमंडळ जवळ पुणे. |
| **आरोपीत** | दोन अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०४/२४ रोजी १४/०० वा. ते १४/३० वा.दरम्यान लोकमान्य नगर, इमारत क्रमांक २७ च्या पश्मिम बाजूस असणा-या फुटपाथवरील प्रभाग क्रमांक ५१ ब बोर्डाच्या खाली सिमेंटच्या कटटा |
| **तपशिल** | यातील दोन इसमांनी फिर्यादी यांना नमुद ठिकाणी गरीब लोकांना मोफत धान्य वाटप चालु आहे.तुम्ही आमच्यासोबत चला, तुम्हांलापण मोफत धान्य देतो, तुमचे दागिने तुमच्याजवळ असणा-या पिशवीत काढून ठेवा, त्याठिकाणी असणा-या मॅडमला तुम्ही गरीब आहे असे सांगितले आहे. असे बोलुन फिर्यादीचे ८१,४००/- रू.किं.चे सोन्याचे दागिने व पैसे असलेल्या पिशवीला दोरी बांधुन,फिर्यादीचा विश्वास संपादन करुन हातचलाखीने पिशवीमधील फिर्यादीचे सोन्याचे दागिने व पैसे घेवून निघुन गेले |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.पवार २०२/२४२२०२०५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**